


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २२६, शुक्रवार २४ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# बंदोबस्तात गेलेल्या कर्मचाऱ्याचे फुटेज द्या!

■ नीलेश लंके यांची मागणी ■ लंके यांच्याकडून आणखी एक व्हिडीओ ट्वीट ■ लंके आपल्या भूमिकेवर ठाम

नगर : विशेष प्रतिनिधी

**नगर दक्षिण लोकसभा मतदार संघाच्या निवडणूकीसाठी मतदान झाल्यानंतर ईव्हीएम मशिन ठेवण्यात आलेल्या गोदामाजवळ एक इसम गेल्याच्या उमेदवार नीलेश लंके यांच्या दाव्यात तथ्य नसल्याचा खुलासा जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमाठ यांनी केल्यानंतर नीलेश लंके यांनी पुन्हा एक व्हिडीओ ट्वीट करीत सुरक्षा रक्षकांच्या बंदोबस्तात सीसीटीव्ही यंत्रणा दुरूस्तीसाठी गेलेल्या कर्मचाऱ्याचे सीसीटीव्ही फुटेज द्या अशी मागणी केली आहे.**



दि.२१ मे रोजी रात्री ८ वाजून २२ मिनिटांनी एक व्यक्ती ईव्हीएम मशिन ठेवलेल्या गोदामाभोवतीची त्रिस्तरीय सुरक्षा यंत्रणा भेदून गोदामाच्या शटरजवळ पोहचली. तिथे मोबाईल काढून सीसीटीव्ही डिव्हाईसमध्ये त्या व्यक्तीने छेडछाड केल्याचे सीसीटीव्ही फुटेजचा व्हिडीओ व्टिट करून नीलेश लंके यांनी निदर्शनास आणले होते.

राज्यातील बारामती, शिरूर लोकसभा मतदारसंघातही सीसीटीव्ही यंत्रणेत हेराफेरी झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असताना नगरमध्येही तशाच प्रकारची तक्रार करण्यात आल्याने राज्यात एकच खळबळ उडाली होती. नीलेश लंके यांनी दि. २२ रोजी सकाळीच सीसीटीव्ही फुटेज व्टिट करून प्रशासनावर संशय व्यक्त केल्यानंतर राज्यभरातील वृत्तवाहिन्यांवर संबंधित वृत्त चांगलेच गाजले.

नगरच्या सुरक्षा यंत्रणेवर संशय व्यक्त करण्यात आल्याने जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी घाईने माध्यमांशी संवाद साधून लंके यांनी व्टिट केलेल्या व्हिडीओमधील व्यक्ती निवडणूक प्रशासनाकडून विहीत नियमानुसार नेमण्यात आलेल्या सीसीटीव्ही पुरवठादार आहे. पुरवठादाराशी झालेल्या करारनाम्यानुसार सीसीटीव्ही अनुषंगिक उपकरणे वेळोवेळी तपासून ती सुस्थितीत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी पुरवठादाराची असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रसिध्दीपत्रकात नमुद करण्यात आले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे दि.२१ मे रोजी सायंकाळी ७ वाजून ५४ मिनिटांनी देखरेखीसाठी नियुक्त करण्यात आलेले जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांच्या असे निदर्शनास आले की मतमोजणी हॉलच्या एका कॅमेऱ्याचे लुज कनेक्शन आहे. त्यानुसार त्यांनी सायंकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी पुरवठादार अजिनाथ मुळे यांना कळविले होते. पुरवठादार यांनी तिथे उपस्थित सुरक्षा व्यवस्थेस तशी कल्पना दिली होती. सुरक्षा रक्षकांनी ८ वाजून २० मिनिटांनी नोंदवहीत नोंद केली. सीआरपीएफच्या दोन सुरक्षा रक्षकांसह पुरवठादार यांनी मतमोजणी हॉलची तपासणी केली होती. त्यानंतर तिथून निघताना पुन्हा ८ वाजून २५ मिनिटांनी नोंदवहीत नोंद करण्यात आल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

### फुटेज सादर होईल का ? सन्मानीय कलेक्टर साहेब,

**सप्रेम नमस्कार, तुम्ही दिलेल्या या घटनेच्या स्पष्टीकरणाला अनुसरून खास आपल्या अवलोकनार्थ हा दुसरा व्हिडीओ पोस्ट करीत आहे. व्यवस्थित बघा. सदर व्यक्ती आत जाते पण बंदोबस्तावर असलेल्या, थोडक्यात कर्तव्यावर असणाऱ्या पोलीस यंत्रणेलाच याची माहिती नाही. कोण आत गेले, कोण बाहेर आले याची त्यांना खबर नाही. सदर व्यक्ती सीसीटीव्हीची देखभाल दुरूस्ती करीत असल्याचा दावा केला जात आहे. पण त्या व्यक्तीला कोणता सीसीटीव्ही कोठे आहे, याची माहीती नाही. आत जाणारी व्यक्ती एकटीच गेली. सोबत तर कोणीच दिसत नाही. मग त्याने कोणाचा बंदोबस्त घेतला हे सांगता येईल का ? तेथील त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्थेलाही ही व्यक्ती आत गेल्याचे माहित नाही. केवळ तुमच्या तोंडी आदेशाने अशा प्रकारे तेथे कोणालाही कसलीही कल्पना न देताती व्यक्ती शटरपर्यंत कशी काय जाऊ शकते ? आणि जर विशेष पोलीस बंदोबस्तात गेली असेल तर त्याचे फुटेज तुम्ही जिल्हाधिकारी आहात म्हटल्यावर तुमच्याकडे सहज उपलब्ध होईल ते सादर होईल का ? सांगा बरं**

नीलेश लंके यांचे दुसरे व्टिट

### विखेंच्या पीआरओकडून प्रेस नोटचे प्रसारण !

**जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिध्दीस दिलेली प्रेस नोट विखे यांच्या पीआरओने ९७६७३३५०४१ या क्रमांकावरून प्रसारीत केल्याचा दावा लंके समर्थकांकडून करण्यात येत आहे. कलेक्टर साहेबांची प्रेस नोट आधी विखेंच्या कार्यालयात बनविली गेली. त्यांच्या पीआरओ कडून प्रसारीत करतानाचा पुरावा सादर करीत, म्हणजेच तुमच्यात नक्कीच काहीतरी शिजतंय. कलेक्टर जिल्हयाचे आहेत की एका परीवाराचे हे सर्वांना आता दिसतंय असेही लंके समर्थकांकडून सोशल मीडियावर करण्यात आलेल्या पोस्टमध्ये नमुद करण्यात आले आहे.**

### सुरक्षा व्यवस्थेला कल्पना न देताच !

**गोदामाच्या शटरजवळील सीसीटीव्ही डीव्हाईसजवळ पोहचलेला तो कर्मचारी सुरक्षा व्यवस्थेला अथवा देखरेखीसाठी उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांना कल्पना न देताच गेल्याचे लंके यांनी व्टिट केलेल्या व्हिडीओवरून स्पष्ट होते. लंके समर्थकांनी फुटेज दाखविल्यावर ते फुटेज आजचे नाहीच असे सांगत कर्मचाऱ्याने हात वर करण्याचाही प्रयत्न केला. कलेक्टर साहेबांना बोलवा, ते मला विचारतील त्यावेळी मी त्यांना माहीती देईल असे सांगत तो वेळ मारून नेण्याचाही प्रयत्न करीत होता. त्या कर्मचाऱ्याने कल्पना दिली नसल्याचे सुरक्षेसाठी उपस्थित स्थानिक पोलीसही अप्रत्यक्ष मान्य करतात. त्या कर्मचाऱ्यास पोलीस कर्मचाऱ्याने दरडावल्याचेही व्हिडीओमध्ये दिसत आहे. या घटनेबाबत संदेश पाठविण्याबाबतही स्थानिक पोलीस अधिकारी देखरेखीसाठी ठेवण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना सांगत असल्याचेही व्हिडीओमध्ये दिसते आहे.**

# प्रवरा नदीत एसडीआरएफ पथकाची बोट उलटली

■ तीन जणांचा मृत्यू ■ शोध मोहिम सुरु असताना घडली घटना



अकोले : प्रतिनिधी

**प्रवरा नदीत बुडालेल्या युवकाचा शोध घेण्यासाठी आलेल्या नाशिक येथील आपत्ती व्यवस्थापन पथकाची बोट आज सकाळी उलटून या पथकातील चार जणांसह एकूण पाच जण प्रवरा नदी पात्रात बुडाले. यातील तीन जणांचे मृतदेह सापडले असून अन्य दोन जणांचा शोध सुरू आहे. बुधवारपासून याठिकाणी झालेल्या अपघातात एकूण चार जण बुडून मृत्यू पावले असून बुडालेल्या अन्य तिघांचा अद्याप पर्यंत शोध लागलेला नाही.**

काल बुधवारी दुपारी अकोले तालुक्यातील सुगाव बुद्रुक येथे प्रवरा नदी पात्रात पोहण्यासाठी गेलेले सागर पोपट जेडगुले (वय २५ रा. धुळवड, ता सिन्नर) व अर्जुन रामदास जेडगुले (वय १८ ,रा .पेमगिरी, तालुका संगमनेर) हे दोघे तरुण बुडाले होते. त्यातील सागर जेडगुले याचा मृतदेह कालच सापडला तर अर्जुन जेडगुले याचा शोध सुरू होता, पण काल त्याला यश आले नाही.

या तरुणाच्या शोध घेण्यासाठी नाशिक येथील आपत्ती व्यवस्थापनाचे पथक आज सकाळी घटनास्थळी दाखल झाले. या तरुणाचा तपास सुरू असतानाच शोध पथकाची बोट उलटून पथकातील चार व स्थानिक युवक गणेश मधुकर देशमुख (वय -३७, रा.सुगाव बुद्रुक )असे पाच जण बुडाले. यातील तिघांचा बुडाल्यामुळे मृत्यू झाला आहे. बुडालेल्या पैकी प्रकाश नामा शिंदे, वैभव सुनील वाघ व राहुल गोपीचंद पावरा (सर्व रा. धुळे) या तिघांना बाहेर काढण्यात यश आले.

दरम्यान, या सर्वांना पुढील उपचारासाठी अकोले येथील डॉ भांडकोळी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते मात्र या तिघांनाही वाचविण्यात डॉक्टरांना यश आले नाही. तर वाचविलेल्या पंकज पंढरीनाथ पवार (वय -३३, रा.धुळे) या चौथ्या तरुणावर प्रारंभी अकोले ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्याची प्रकृती स्थिर असली तरी त्याला अंडर मेडीसीन ठरण्यासाठी डॉ भांडकोळी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले आहे.

सुगाव बुद्रुक येथे प्रवरा नदी पात्रातील पाझर तलावामधून पडणाऱ्या पाण्याचा दाब अधिक असून तेथे भोवरा असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे ही दुदैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान घटनास्थळी माजी मंत्री आमदार बाळासाहेब थोरात ,आमदार डॉ किरण लहामटे,माजी आमदार वैभवराव पिचड यांनी घटनास्थळी भेट दिली. स्थानिक नागरिकांसह अकोले तालुक्यातील नागरिकांनी परिसरात मोठी गर्दी केली होती.

# आमदार पी. एन. पाटील यांचे निधन

■ मृत्यूशी झुंज अयशस्वी ■ काँग्रेसचा निष्ठावंत शिलेदार हरपला

कोल्हापूर : प्रतिनिधी

**काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आणि करवीर विधानसभा मतदारसंघाचे आमदार पी. एन. पाटील यांचे वयाच्या ७१, व्या वर्षी निधन झाले आहे. पहाटेच्या सुमारास खाजगी रुग्णालयात उपचारा दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. पाटील यांची गांधी घराण्याचे विश्वासू आणि दिवंगत नेते विलासराव देशमुख यांचे खंदे समर्थक म्हणून ओळख होती.**



पाटील हे रविवारी राहत्या घरातील बाथरुममध्ये पाय घसरुन पडले होते. त्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. यानंतर त्यांच्यावर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र उपचार सुरु असतानाच त्यांचे निधन झाले. पी.एन. पाटील यांची नेहमीच आपल्या वैचारिक भूमिकेला कुठेही ठेच आणि डाग न लावता राजकारण करणारा आमदार म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात ओळख होती. अलीकडेच ईडीचा वापर करून आमदारांवर दबाव टाकण्याचे प्रयत्न सुरु असताना पाटील स्वतः ईडी कार्यालयात हजर राहून चौकशीला सामोरे गेले होते. यानंतर आज त्यांचे उपचारादरम्यान निधन झाले.

काँग्रेसमध्ये दोन गट पडल्यानंतर १९९९ साली आमदार पी.एन. पाटील यांना जिल्हा काँग्रेस पदाची जबाबदारी मिळाली होती. तेंव्हापासून ते आत्तापर्यंत पाटील यांनी कधीही खांद्यावरून तिरंगा उतरू दिला नाही. पाटील यांचे मूळगाव करवीर उर्वरीत पान ३ वर

# नंदुरबारमध्ये शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांची काँग्रेसला मदत ?

नंदुरबार: प्रतिनिधी

**राज्यात लोकसभेसाठी भाजपा, शिवसेनेमधील शिंदे गट आणि राष्ट्रवादी या महायुतीतील घटक पक्षांनी एकत्र राज्यभर निवडणुका लढवल्या. मात्र नंदुरबार लोकसभेमध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस अशी लढत असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नंदुरबार येथे येऊन मध्यस्थी करूनही शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसचा प्रचार करीत मतदानावेळी मदत केल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे चार जून रोजी निकालानंतर नंदुरबार जिल्ह्यात भाजपा व शिंदे गटात मोठा संघर्ष पाहायला मिळणार आहे असे चित्र दिसत आहे.**



नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित व शिंदे गटाचे नेते चंद्रकांत रघुवंशी यांचा संघर्ष गेल्या पंचवीस वर्षापासून आहे. डॉ. विजयकुमार गावित हे सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मंत्री होते. तर चंद्रकांत रघुवंशी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार म्हणून कार्यरत होते. त्यावेळी राज्यात युती असतानाही दोघांमधील प्रचंड वाद होते. तेव्हापासून या नेत्यांमध्ये कुठल्या ना कुठल्या गोष्टीवरून संघर्ष सुरूच असतो. २००९ मध्ये नंदुरबार विधानसभेसाठी राष्ट्रवादीने डॉ. विजयकुमार गावित यांना उमेदवारी दिली होती. त्याचवेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत रघुवंशी यांनी भाजपाच्या उमेदवार उर्वरीत पान ३ वर

# डोंबिवलीतील स्फोटात ३ कामगारांचा मृत्यू

■ एमआयडीसीत केमिकल कंपनीत स्फोट ■ ३० कामगार जखमी कामगारांवर उपचार सुरु

डोंबिवली: प्रतिनिधी

**डोंबिवली एमआयडीसीत केमिकल कंपनीमध्ये झालेल्या स्फोटात ३ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून जवळपास ३० कामगार जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर उपचार करत आहे. घटनास्थळी आगीच्या ज्वाळा आणि धुराचे मोठ्या प्रमाणावर लोट असल्याने बचाव कार्यात अडथळा येत आहे. या दुर्घटनेत मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. उद्योगमंत्री उदय सामंत आणि कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी घटनास्थळी जाऊन बचावकार्याची माहिती घेतली तसेच यंत्रणेला सूचना केल्या.**

डोंबिवली एमआयडीसी फेस दोन मधील अंबर केमिकल कंपनीच्या बॉयलरमध्ये दुपारी १ वाजताच्या सुमारास मोठा स्फोट झाला. डोंबिवलीत अनेक



किलोमीटरपर्यंत या स्फोटाचे हादरे जाणवले. परिसरातील अनेक इमारतींच्या काचा फुटल्या आहेत. घटना घडल्यानंतर काही वेळातच अग्निशमन दलाच्या पाच गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. आग नियंत्रण आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. मात्र आगीच्या ज्वाळा आणि धुराचे मोठ्या प्रमाणावर लोट असल्याने बचाव कार्यात अडथळा येत आहेत.

३ कामगारांचा मृत्यू, ३० जखमी घटनास्थळाला भेट दिल्यानंतर आणि यंत्रणांकडून माहिती घेतल्यानंतर उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, प्राथमिक माहितीनुसार बॉयलरमध्ये स्फोट झाल्याची माहिती आहे. या स्फोटात सध्याच्या माहितीनुसार ३ कामगार मृत्यूमुखी पडले आहेत. धूर आणि आग मोठी असल्याने मृत्यूचा नेमका आकडा सांगता येत नाही. दोन तासांनंतर चित्र स्पष्ट होईल. मृतांच्या नातेवाईकांना शासनाकडून मदत केली जाईल, कुणालाही वाऱ्यावर सोडले जाणार नाही, हे मुख्यमंत्री महोदयांच्या वतीने मी आश्वसन करतो, असे उदय सामंत यांनी सांगितले.

**देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?**

डोंबिवली एमआयडीसीतील अमुदान केमिकल कंपनीत बॉयलरचा स्फोट झाल्याची घटना दु:खद आहे. ८ जण या घटनेत अडकले होते. त्यांना बाहेर काढण्यात आले आहे. जखमींच्या उपचाराची व्यवस्था करण्यात आली असून आणखी रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकार्यांशी माझी चर्चा झाली असून एनडीआरएफ, टीडीआरएफ, अग्नीशमन दलाच्या चमू पाचारण करण्यात आल्या आहेत. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.







# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या


# AI अन् AGI

**सध्या जगभरात कृत्रिम बुद्धीमत्तेची (AI) जोरदार चर्चा सुरू आहे. दिवसेंदिवस त्यामध्ये नवनव्या सुधारणा होत असल्याचे दिसून येत आहे. ओपन एआय कंपनीचे सीईओ सॅम ऑल्टमन यांनी आर्टिफिशियल जनरल इंटेलिजेन्स (AGI)च्या विकासासाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करण्याची तयारी दाखविली आहे. ते 'द वॉल स्ट्रीट जर्नल'ला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी ही माहिती दिली. सध्या अस्तित्वात असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) अत्युच्च विकास म्हणून एजीआयकडे पाहिले जात आहे. दुसरीकडे तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक जागतिक कंपन्यांमध्ये यामुळे भीतीचे वातावरण पसरले आहे.**




## एआय आणि एजीआयमध्ये काय फरक आहे?

एआय (AI) आणि एजीआय (AGI) यामध्ये नक्कीच फरक आहे. मुख्य फरक आहे व्याप्ती आणि क्षमतेचा! एआय एखादी विशिष्ट कृती करण्यासाठी तुम्हाला मदत करू शकेल. उदाहरणार्थ- चित्र ओळखणे, त्यावर प्रक्रिया करणे, भाषांतर करणे वा तुमच्याबरोबर बुद्धिबळासारखा खेळ खेळणे. एआयकडून ही सगळी कामे मानवापेक्षा जलद आणि अचूक गतीने केली जात असली तरीही त्याची क्षमता तेवढ्या एखाद्या कृतीपुरतीच मर्यादित राहते. दुसऱ्या बाजूला एजीआय एखाद्या कृतीपुरते मर्यादित नाही. त्याची क्षमता आणि व्याप्ती एआयपेक्षा अधिक मोठी असेल. ते अगदी मानवी बुद्धिमत्तेप्रमाणे अचूकपणे एकाच वेळी अनेक कामे करू शकेल. त्यामुळेच एजीआयबाबतच्या घडामोडींकडे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासाचे अत्युच्च शिखर म्हणून पाहिले जात आहे. संशोधकांकडून एआयच्या क्षमतांमध्ये वाढ करण्याचे प्रयत्न आधीपासूनच केले जात आहेत. म्हणूनच नोव्हेंबर २०२२ मध्ये चॅटजीपीटीसारखे एआय माध्यम बाजारात आल्याबरोबर अल्पावधीतच इतके लोकप्रिय झाल्याचे दिसून आले. ते अगदी मानवी बुद्धिमत्तेप्रमाणेच मजकुरावर प्रक्रिया करू शकते, हेच त्यामागचे कारण आहे. तेव्हापासून एआय हा विषय अधिक प्रमाणात चर्चेला आला. सध्या त्यामधील संशोधनाला अधिकाधिक गती देण्यासाठी अब्जावधी डॉलर्स खर्च केले जात असल्यामुळे आता दिवसेंदिवस एआयची माध्यमे अधिकाधिक विकसित होत आहेत. एजीआय हे याच एआय विकासाचे अत्युच्च शिखर ठरेल, यात शंका नाही.




## एजीआय म्हणजे काय?


एजीआयमुळे एखाद्या मनुष्याला करता येईल असे कोणतेही काम मशीन अथवा सॉफ्टवेअरलाही करता येईल. त्यामध्ये तर्कवितर्क, सामान्य ज्ञान, कार्यकारणभाव इत्यादी मानवी कौशल्यांचा समावेश असेल. अगदीच सोप्या शब्दांत सांगायचे झाले तर, एजीआयमुळे मशीनला मानवी बुद्धीप्रमाणेच काम करता येईल. मशीनदेखील माहीत नसलेल्या गोष्टी नव्याने शिकणे, नव्या अनुभवांमधून शिकणे आणि प्राप्त केलेली माहिती वापरात आणण्यासारख्या अनेक गोष्टी मानवाप्रमाणेच शिकू शकेल. मनुष्य त्याच्या अनुभवांमधून विविध गोष्टी शिकतो. घर, शाळा वा इतर ठिकाणांमधून त्याला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळतात. एखाद्या गोष्टीचे निरीक्षण करून वा लोकांशी संवाद साधून वा पुस्तके, टीव्ही अशा माध्यमांतूनही त्याची जडणघडण होते आणि त्याच्या मेंदूचा विकास होतो. त्यानंतर मनुष्याचा मेंदू विविध अडचणींवर मार्ग काढण्यासाठी या सगळ्या अनुभवांतून प्राप्त झालेल्या माहितीचा वापर करतो. एजीआयमुळे एखादे सॉफ्टवेअर अथवा मशीनदेखील अगदी हीच क्षमता प्राप्त करू शकेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा एवढा विकास प्रत्यक्षात आणण्याचे संशोधकांचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे मानवी मेंदू ज्याप्रमाणे काम करतो अगदी तसेच काम एजीआयमुळे मशीनलाही करता येऊ शकेल, या दृष्टीने संशोधक काम करीत आहेत. म्हणजे कुशाग्र बुद्धिमत्तेचा यंत्रमानव अगदी माणसासारखाच तुमचा मित्र असेल. तो तुम्हाला काय म्हणायचे आहे ते अगदी सहजपणे समजून घेऊ शकेल, नव्या गोष्टी शिकू शकेल आणि एखाद्या समस्येवर त्याच्या बुद्धिमत्तेने उपायही काढू शकेल.



## ही पूर्णपणे नवी कल्पना आहे का?

नाही. ही पूर्णपणे नवी कल्पना आहे, असे म्हणता येणार नाही. २० व्या शतकात पहिल्यांदा एजीआयची संकल्पना मांडण्यात आली होती. कृत्रिम बुद्धिमत्तेचे जनक मानल्या जाणाऱ्या ॲलन ट्युरिंग यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये सर्वप्रथम ही संकल्पना मांडली होती. त्यांनी 'कॉम्प्युटिंग मशिनरी ॲण्ड इंटेलिजेन्स' (१९५०) या शोधनिबंधामध्ये यंत्रांची बुद्धिमत्ता मोजण्यासाठी 'ट्युरिंग टेस्ट' नावाची नवी संकल्पना मांडली होती. ट्युरिंग टेस्टनुसार एखादे मशीन जर माणसाबरोबर माणसाप्रमाणेच संवाद साधू शकत असेल, तर ते मानवी बुद्धिमत्तेचेच प्रदर्शन करीत असल्याचे द्योतक आहे, असे सांगण्यात आले होते. ट्युरिंग यांनी हा शोधनिबंध लिहिला तेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास अजिबात झालेला नव्हता. इतकेच काय, संगणकही त्याच्या प्राथमिक अवस्थेत होता. मात्र, ट्युरिंग यांनी ही संकल्पना मांडल्यामुळे अशा प्रकारच्या यंत्रांच्या अस्तित्वाबाबतच्या चर्चांना सुरुवात झाली होती. मानवी बुद्धिमत्तेची क्षमता असणाऱ्या अशा यंत्रांच्या फायद्या-तोट्यांवरही चर्चा होऊ लागल्या.

## एजीआयचा मानवासाठी काय फायदा होऊ शकतो?




तात्त्विकदृष्ट्या एजीआयचे असंख्य सकारात्मक फायदे सांगता येऊ शकतात. उदाहरणार्थ- आरोग्याच्या क्षेत्रामध्ये एजीआयचा वापर केल्यास कमी कालावधीमध्ये अचूक पद्धतीने रोगाचे निदान, उपचाराची पद्धती आणि रुग्णपरत्वे औषधोपचारही निश्चित करता येऊ शकतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या माहितीच्या विस्तृत साठ्याचे कमी कालावधीत विश्लेषण करून निर्णय घेणे ही मानवी बुद्धिमत्तेच्या पलीकडे जाणारी गोष्ट आहे. मात्र, एजीआयमुळे हे वास्तवात येऊ शकते. अगदी अर्थकारणात आणि व्यवसायांमध्येही एजीआयचा वापर प्रभावीपणे केला जाऊ शकतो. एजीआयद्वारे सद्यःस्थितीतील बाजाराचे अचूक विश्लेषण करून अंदाज वर्तविण्याचे कामही सहजतेने होऊ शकते. शिक्षण क्षेत्राचे उदाहरण घेतल्यास, एजीआयमुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या अनोख्या गरजा पूर्ण करता येऊ शकतात. प्रत्येकाची क्षमता ओळखून, त्याच्या गरजेनुसार त्याला शिक्षण देण्याची व्यवस्था अस्तित्वात आणता येऊ शकते.


## संशयाचे वातावरण का?

एकीकडे एजीआयचे इतके फायदे सांगितले जात असताना दुसरीकडे मात्र त्याबाबत भीतीही व्यक्त केली जात आहे. एजीआय प्रणाली विकसित करण्यासाठी होणारा उर्जेचा वापर आणि ई-कचऱ्याच्या निर्मितीमुळे पर्यावरणावर होणारा परिणाम हा चिंतेता विषय आहे. एजीआयमुळे रोजगारामध्येही मोठ्या प्रमाणावर घट होऊ शकते; तसेच सामाजिक आणि आर्थिक विषमतेमध्येही प्रचंड वाढ होऊ शकते, असे म्हटले जात आहे. दुसरीकडे ज्यांच्या हातात एजीआयचे नियंत्रण असेल त्यांच्या हातात इतरांपेक्षा अधिक अधिकार येऊ शकतात. असे झाल्यास, त्यामुळे नव्या प्रकारच्या समस्या आणि व्यवस्था उदयाला येऊ शकते; ज्याची आपण कल्पनाही केलेली नसेल. जर मनुष्य एजीआय तंत्रज्ञानावर अधिकाधिक विसंबून राहू लागला, तर तो आपल्या मूलभूत मानवी क्षमता आणि कौशल्येही गमावून बसण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. एजीआय मानवी क्षमतेला ओलांडून त्याच्याही पुढे जाऊ शकते, हाच एजीआयबाबतचा सर्वांत मोठा धोका आहे. असे झाल्यास, मानवाला एजीआयच्या संभाव्य कृती समजून घेणे आणि त्यांचा अंदाज वर्तविणेही कठीण होऊ शकते. अनेक साय-फाय चित्रपटांमध्ये मानवाचे यंत्रमानवांवरील नियंत्रण सुटून, ते अधिक शक्तिशाली झाल्याचे चित्रण केले गेले आहे. चित्रपटांमध्ये असे यंत्रमानव मानवी कल्याणाच्या विरोधात जाताना दिसतात. अगदी तसेच काहीसे येणाऱ्या भविष्यात वास्तवात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. बीबीसीला २०१४ मध्ये दिलेल्या मुलाखतीमध्ये दिवंगत प्राध्यापक स्टीफन हॉकिंग म्हणाले होते, "कृत्रिम बुद्धिमत्तेचा संपूर्ण विकास झाला, तर मानवजातीचा अंतही होऊ शकतो." त्यामुळेच एजीआयचा विकास हा मानवी मूल्यांशी सुसंगत आणि मानवाच्या सुरक्षिततेला धरूनच व्हायला हवा. त्यासाठी अनेक विचारवंत मांडणी करताना दिसतात.

# 'ॲपल'चाही फोन हॅक होऊ शकतो!

**ॲपलचा संपूर्ण व्यवसाय आपल्या फोन आणि कॉम्प्युटरमध्ये कोणीही घुसखोरी करू शकत नाही या विश्वासावर आधारित असल्याने त्यांच्यासाठी फोन हॅक होणे मोठे आव्हान बनले आहे.**

जगातील सर्वात सुरक्षित मोबाइल फोन आणि कॉम्प्युटर बनवण्याचा दावा करणाऱ्या ॲपल या कंपनीने आपले उत्पादन वापरणाऱ्यां संदेश पाठवला आहे की, मर्सनेरी स्पायवेअरद्वारे हेरगिरी सॉफ्टवेअरद्वारे त्यांचे फोन हॅक केले जाऊ शकतात, त्यामुळे वापरकर्त्यांनी सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. हा संदेश ॲपलने भारतासह ९१ देशांतील त्यांच्या ग्राहकांना ई-मेलद्वारे पाठवला आहे. हे सॉफ्टवेअर वादग्रस्त ठरलेल्या 'पेगासस' स्पायवेअरप्रमाणे आहे. सहा महिन्यांपूर्वीही ॲपलने भारतातील काही लोकांना त्यांचे फोन पेगाससचे लक्ष्य असू शकतात, असा इशारा दिला होता. यातील बहुतांश विरोधी पक्षांचे नेते होते, त्यामुळे याबाबत बराच गदारोळ झाला होता. पण सरकारच्या दबावाखाली ॲपलने आपला इशारा मागे घेतला. तथापि, या वेळी कंपनीने आपल्या ग्राहकांना अत्यंत गांभीर्याने सावध केले आहे. भारतातील काही वापरकर्त्यांना ११ एप्रिलला पहाटे साडेबाराच्या सुमारास धोका सूचना (थ्रेट नोटिफिकेशन) पाठवली गेली. यामध्ये म्हटले होते की, आपला फोन 'भाडोत्री स्पायवेअर'द्वारे लक्ष्य केला जात आहे. मात्र, या हेरगिरी सॉफ्टवेअरद्वारे ज्यांचे फोन हॅक करण्यात आले, त्यांची नावे त्यांनी उघड केलेली नाहीत. तथापि, जगभरात असे हल्ले होत असल्याचे कंपनीने मान्य केले आहे.



## ॲपल जगातील आघाडीची कंपनी

ॲपल ही तंत्रज्ञानाच्या विश्वातील जगातील सर्वांत आघाडीची कंपनी आहे. २००७ मध्ये पहिला आयफोन बाजारात आला. त्यानंतर आज दीड दशकानंतरची स्थिती पाहिल्यास जगभरात १.४७ अब्ज लोकांकडे ॲपलचा फोन आहे. जगात वापरल्या जाणाऱ्या स्मार्टफोनमध्ये ॲपलचा वाटा २१.६७ टक्क्यांहून अधिक आहे. अँड्रॉइडच्या स्मार्टफोनपेक्षा ॲपल फोनच्या किमती काही पटींनी अधिक असतात. त्यामुळे आयफोन वापरणे हे भारतात स्टेटस सिम्बॉल ठरले आहे. अधिक प्रमाणात पैसे देण्यामागे प्रतिष्ठेखेरीज आणखी एक कारण म्हणजे या फोनची सुरक्षितता. अँड्रॉइड प्रणालीपेक्षा ॲपलची आयओएस ही प्रणाली अधिक प्रगत, अद्ययावत आणि तुलनेने अधिक सुरक्षित मानली जाते. असे असूनही ॲपलचे अत्यंत सुरक्षित मानले जाणारे फोन हॅक होत असतील, तर मग अँड्रॉइडवर चालणाऱ्या इतर फोनच्या सुरक्षेची काय स्थिती असेल याची कल्पनाच न केलेली बरी! ॲपलने कबूल केले आहे की ही घुसखोरी कोणत्याही सामान्य सायबर चोराच्या आवाक्यातली नाही. कारण ज्या सॉफ्टवेअरद्वारे हा हल्ला केला जात आहे त्याची किंमत लाखो डॉलर्स आहे. ॲपल या सॉफ्टवेअरवर मात करण्यासाठी काही व्यवस्था करू शकेल की नाही हे येणारा काळच सांगेल, पण लोकांच्या गोपनीयतेमध्ये घुसखोरी केल्याबद्दल जगातील सर्व सरकारे आता पुन्हा निशाण्यावर येणार आहेत.

## नक्की काय होते?

पेगासेस हे सॉफ्टवेअर खरे तर एक प्रकारचे गुप्तहेर आहे. हे सॉफ्टवेअर कोणाच्याही फोनमध्ये गुपचूप इन्स्टॉल केले जाऊ शकते आणि त्यानंतर त्या फोनचा कॅमेरा, माइक इत्यादींवर नियंत्रण मिळवून तो संबंधित चोराला आपल्या पद्धतीने ऑपरेट करता येतो. सायबर सुरक्षा कंपनी कॅस्परस्कीच्या अहवालानुसार, पेगाससच्या मदतीने एन्क्रिप्टेड ऑडिओ आणि एनक्रिप्टेड संदेशदेखील वाचले जाऊ शकतात. एन्क्रिप्टेड केलेले संदेश असे असतात जे केवळ संदेश पाठवणाऱ्या आणि प्राप्तकर्त्यालाच माहीत असतात. ज्या कंपनीच्या प्लॅटफॉर्मवर मेसेज पाठवला जात आहे ती कंपनीदेखील पाहू शकत नाही किंवा ऐकू शकत नाही. पण पेगासस वापरून हॅकर त्या व्यक्तीच्या फोनशी संबंधित सर्व माहिती मिळवू शकतो. २०१९ पर्यंत हे फोनमध्ये व्हॉट्स ॲप मिसकॉलद्वारे देखील इंस्टॉल करता येत होते. आयफोनमध्ये, आयमेसेज या बगचा फायदा घेऊन ते इंस्टॉल केले जायचे. आता तर कंपनीने अधिकृतरित्या संदेश पाठवून इशारा दिल्यामुळे आयफोन वापरकर्त्यांच्या चिंता कमालीच्या वाढल्या आहेत. खुलेआम वापरकर्त्यांच्या स्मार्टफोनवर डल्ला मारला जात असेल तर तो गोपनीयतेच्या आणि खासगीपणाच्या अधिकाराचा भंग आहे. त्यामुळे सरकारने याबाबत गांभीर्याने लक्ष घालून सुरक्षिततेसंदर्भात पुढाकार घ्यायलाच हवा.



## आधी चिंता, त्यात आणखी भर...

सुमारे तीन वर्षांपूर्वी जेव्हा भारतात पेगाससचा वापर उघडकीस आला, तेव्हा बराच गदारोळ झाला होता. सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या. हे सॉफ्टवेअर इस्रायली सरकारने विकले असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे याबाबत मखलाशी करताना इस्रायल सरकार म्हणते की, कोणत्याही स्वतंत्र व्यक्ती किंवा कंपनीला आम्ही ते विकत नाही; तर केवळ सरकारांनाच हे सॉफ्टवेअर दिले जाते. त्यामुळे हे प्रकरण अधिकच गंभीर बनले होते. सायबर गुन्हेगारी, हॅकिंगपासून ते डीपफेकपर्यंतच्या आधुनिक धोक्यांमुळे भारतासारख्या देशात आधीच चिंतेचे वातावरण आहे आणि यावर मात करणे सरकारसाठी मोठे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत पेगासस, मर्सनेरी यांसारख्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून हेरगिरी आणि घुसखोरीचे प्रकरण सिद्ध झाल्यास ती अधिक गंभीर बाब ठरेल.

# Facebook खात्याचा पासवर्ड विसरलात का?

सध्या सोशल मीडिया ॲप्सचा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे. लोकांना घरी बसून मोकळ्या वेळेत सोशल मीडिया स्क्रोल करायला आवडते. फेसबुक वापरत नाही असा व्यक्ती तर शोधून सापडणार नाही. फेसबुक खाते नेहमी फोनवर लॉग इन केले जाते. परंतु काहीवेळा तुम्हाला तुमच्या फोन किंवा पीसी व्यतिरिक्त इतर डिव्हाइसवर Facebook लॉग इन करावे लागेल. अशा परिस्थितीत, बऱ्याच वेळा वापरकर्त्यांना त्यांचा पासवर्ड आठवत नाही आणि ते त्यांच्या खात्यात लॉग इन करू शकत नाहीत. तुम्हालाही अशीच समस्या असेल तर आज आम्ही तुम्हाला त्यावर उपाय सांगत आहोत. तुम्ही तुमचा फेसबुक पासवर्ड सहजपणे रीसेट करू शकता. यासाठी तुम्हाला फक्त तुमचा नोंदणीकृत ईमेल आयडी किंवा फोन नंबर लक्षात ठेवावा लागेल.



फेसबुक पासवर्ड कसा रिसेट करायचा ते स्टेप बाय स्टेप समजून घ्या...

## फेसबुक पासवर्ड कसा रीसेट करायचा...

- सर्वप्रथम तुम्हाला www.facebook.com वर जावे लागेल. यानंतर फेसबुक लॉगिन पेज ओपन करावे लागेल.
- त्यानंतर तुम्हाला तुमचा ईमेल आयडी टाकावा लागेल. त्यानंतर Forget Password वर क्लिक करा.
- आता एक नवीन स्क्रीन उघडेल ज्यामध्ये तुम्हाला तुमचा मेल आयडी किंवा तुमचा फोन नंबर टाकावा लागेल.
- आता तुम्हाला एका पृष्ठावर पुनर्निर्देशित केले जाईल ज्यामध्ये तुम्हाला तीन पर्याय मिळतील. यामध्ये Google खाते वापरा, ईमेलद्वारे कोड पाठवा किंवा संदेशाद्वारे कोड पाठवा.
- त्यानंतर तुम्ही कोणताही पर्याय निवडाल, तुम्हाला एक कोड दिला जाईल.
- नंतर स्क्रीनवर कोड प्रविष्ट करा.
- एक नवीन पृष्ठ उघडेल ज्याद्वारे तुम्ही तुमचा पासवर्ड बदलू शकाल.
- आता तुमच्या Facebook खात्याचा पासवर्ड रीसेट केला जाईल ज्याद्वारे तुम्ही तुमच्या Facebook वर सहज लॉगिन करू शकाल.



## शॉर्ट न्यूज

### नेवाशात स्वच्छता व पाणीपुरवठ्याचा बोजवारा

■ **नेवासा :** नगर पंचायत प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे शहरातील स्वच्छता तसेच पाणीपुरवठ्याचा पुरता बोजवारा उडाल्याने नागरिकांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भात नगर पंचायत प्रशासक असलेल्या तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या काही महिन्यांत शहराच्या स्वच्छता तसेच पाणी पुरवठ्याचा पुरता बोजवारा उडाला आहे. शहराच्या जवळपास सर्वच प्रभागांत अस्वच्छता निर्माण झाली असून दुर्गंधीमुळे ग्रामस्थांवर नाक मुठीत धरून वावरण्याची वेळ आली असल्याचे नागरिकांनी दिलेल्या निवेदनात म्हणले आहे.

### अशोक महाविद्यालयास बी ग्रेड मानांकन

■ **श्रीरामपूर :** अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने नॅक मानांकन पात्रतेच्या पहिल्याच प्रयत्नात बी ग्रेड मिळविला आहे. ९ व १० मे या दोन दिवसांत महाविद्यालयाची तपासणी बेंगलोर येथील नॅक समितीकडून करण्यात आली होती. तपासणीसाठी डॉ. सुशील कुमार गुप्ता, डॉ. व्ही. मनिकावसगम, डॉ. विनय कुमार यांची नियुक्ती करण्यात आली होती. महाविद्यालयाचे प्रथमच मूल्यांकन होऊन बी ग्रेड मिळाल्याबद्दल संस्थेचे संस्थापक भानुदास मुरकुटे, संस्थेचे अध्यक्ष कोंडीराम उंडे, मंजुश्री मुरकुटे, आदींनी अभिनंदन केले आहे.

### कालव्यात बुडून तरुणाचा मृत्यू

■ **संगमनेर :** तालुक्यातील शिबलापूर येथील संतोष बबन मुन्तोडे (वय २१) या तरुणाचा प्रवरा उजव्या कालव्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. बुधवारी (दि. २२) सकाळी ११ वाजेच्या सुमारास आश्वी खुर्द (ता. संगमनेर) शिवारातून जाणाऱ्या प्रवरा उजव्या कालव्यात एक मृतदेह आढळून आला होता. त्यानंतर रमेश रतन मुन्तोडे यांनी याबाबतची माहिती पोलिसांना कळल्यानंतर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह कालव्यातून बाहेर काढत उत्तरीय तपासणीसाठी हलविण्यात आला. आश्वी पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### माजी विद्यार्थींचा मेळावा उत्साहात

■ **कोपरगाव :** येथील श्रीमान गोकुळचंदजी विद्यालयामध्ये १९७२ मध्ये दहावीत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न झाला. तब्बल ५२ वर्षानंतर एकत्र आलेले माजी विद्यार्थी तसेच विद्यालयांचे सेवानिवृत्त शिक्षक एकमेकांना भेटुन शाळेच्या जुन्या आठवणीत रममाण झाले. मेळाव्याचेचे अध्यक्षस्थानी कोपरगाव एज्युकेशन सोसायटीचे सचिव दिलीप अजमेरे होते. पिपल्स बँकेचे माजी अध्यक्ष रामविलास मुंदडा मुख्याध्यापक मकरंद कोऱ्हाळकर,उपमुख्याध्यापक रमेश गायकवाड, पर्यवेक्षिका उमा रायते आदी या प्रसंगी उपस्थित होते.

### बंगल्याचे गेट उघडुन दोघेजण घरात घुसले

■ **राहुरी :** वैशाली संजय नान्नोर या राहुरी तालूक्यातील डिग्रस येथे कुटुंबासह राहतात. दुपारच्या दरम्यान वैशाली नान्नोर यांची मुलगी व मुलगा हे घरात होते. त्यावेळी तोंड बांधलेले दोन अज्ञात इसम हाथात पिस्टल व चाकू सारखे हत्यार घेऊन नान्नोर यांच्या बंगल्याचे गेट उघडुन आत घुसले. मात्र नान्नोर यांचे पाळीव कुत्रे जोराजोरात भूकल्याने सदर दोन्ही इसम त्यांच्या मोटरसायकलवर पसार झाले. सदर घटना कॅमेऱ्यात कैद झाली. वैशाली नान्नोर यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात दोन अज्ञात इसमांवर आर्म ॲक्टचा गुन्हा दाखल केला.

# कल्याणीनगरच्या त्या अपघातानंतर त्या गोष्टी आठवल्या

## सोनाली तनपुरे यांची पोस्ट चर्चेत

**राहुरी : प्रतिनिधी**

**कल्याणीनगर येथील कार ॲक्सीडेंटनंतर पुन्हा एकदा त्या गोष्टी आठवल्या. संबंधित घटनेतील मुलगा हा माझ्या मुलासोबत एकाच वर्गात शिकत होता. त्यापैकी काही मुलांकडून माझ्या मुलास खुप त्रास झाला. मुलाची शाळा बदलली मात्र त्या वाईट घटनांचे परिणाम आजही त्याच्या मनावर असल्याचे सांगत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे भाचे, मा. मंत्री, आ. प्राजक्त तनपुरे यांच्या पत्नी सोनाली तनपुरे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली असून सध्या ती चर्चेत आहे.**

सोनाली यांनी आपल्या पोष्टमध्ये कोणाच्याही नावाचा उल्लेख केलेला नाही. मात्र त्यांच्या वक्तव्याचा एकूण सुर पाहता त्यांचया रोख विशाल अग्रवाल यांच्या मुलाच्या दिशेने असल्याचे दिसत आहे. त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, कल्याणीनगर येथील कार ॲक्सीडेंट नंतर पुन्हा एकदा त्या गोष्टी आठवल्या. संबंधित घटनेतील मुलगा हा माझ्या मुलासोबत एकाच वर्गात होता. त्यावेळी त्यापैकी काही मुलांकडून माझ्या मुलाला खूप त्रास झाला होता.



**घटनेचे राज्यभर पडसाद**

**पुण्यातील कल्याणीनगर परिसरातील एका बडया बांधकाम व्यवसायिकाच्या मुलाने आपल्या पोर्शे कारने दोघांना चिरडल्याची घटना नुकतीच घडली. या घटनेनंतर पोलीस आणि न्याय व्यवस्थेने घेतलेल्या अनाकलनीय भुमिकेनंतर सामान्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला. पुण्यासह राज्यभर त्याचे पडसाद उमटले.**

या मुलांची तक्रार मी त्यांच्या पालकांकडे केली. मात्र योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी या मुलांच्या त्रासाला कंटाळून त्याची शाळा बदलावी लागली. त्या घटनांचा वाईट परिणाम आजही त्याच्या मनावर आहे. वाईट प्रवृत्ती असणाऱ्या मुलांची दखल वेळीच घेतली गेली असती तर असा भयंकर गुन्हा कदाचित घडला नसता. त्या दिवशी झालेल्या अपघातात सुशिक्षित तरूण, तरूणीचा निष्पाप बळी गेला. त्यांची कुटूंबे उध्वस्त झाली. या कुटूंबांना न्याय मिळायला हवा.अशी अपेक्षा सोनाली तनपुरे यांनी आपल्या पोस्टमध्ये व्यक्त केली आहे.

# नगरचा पारा ४० अंशावर

## उन्हाच्या तीव्रतेमुळे बाजारपेठेत अघोषित संचारबंदी

**नगर : प्रतिनिधी**

**तापमान वाढल्याने नगरच्या प्रमुख बाजारपेठेत उष्णतेची संचारबंदी लागू झाली होती. बुधवारी नगर शहराचे तापमान ४० अंश सेल्सिअस नोंदवले गेले.जानेवारी- फेब्रुवारी महिन्यात थंडी बरोबरच अवकाळी पाऊस झाला होता. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नगर शहराचे तापमान ३१ अंश सेल्सिअस इतके होते. मार्च शेवटच्या आठवड्यापासून तापमानाचा पारा वाढू लागला होता. एप्रिल महिन्यात सर्वाधिक ३९.८२ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद झाली होती.**

मे महिना सुरू होता उन्हाचा कडाका पुन्हा वाढू लागला होता. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ४० अंश सेल्सिअस इतके तापमान गेले होते. दुसऱ्या आठवड्यात मात्र बहुतांशी दिवस ढगाळ व अवकाळी पावसाचे वातावरण असल्यामुळे पारा ४ अंशाने कमी होऊन ३५-३६ अंशावर तापमान आले होते. नगर शहर व परिसरात बुधवारी पुन्हा तापमानाचा पारा वाढला होता. शहराचे तापमान ४० अंश सेल्सिअसवर नोंदवले गेले होते.



(पान १ वरून)

## नंदुरबारमध्ये शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांची काँग्रेसला मदत ?

सुहासिनी नटावदकर यांना उघड पाठिंबा देत दे धक्का म्हणत प्रचार करीत भाजपला मदत केली. मात्र या निवडणुकीत डॉ. विजयकुमार गावित हे विजयी झाले.

डॉ. विजयकुमार गावित यांनी २०१४ साली भाजपामध्ये प्रवेश केला. त्यावेळी त्यांच्या कन्या डॉ. हिना गावित या नंदुरबार लोकसभेत नऊ वेळेचे खासदार असलेले माणिकराव गावित यांचा पराभव करत विजयी झाल्या. २०१९ मध्ये त्या पुन्हा निवडून आल्या. त्याच कालावधीत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी शिवसेनेत प्रवेश केला. २०१९ च्या विधानसभेवेळी त्यांनी भाजपाचे उमेदवार डॉ. विजयकुमार गावित यांचा प्रचार केला. मात्र त्यानंतर दोघा नेत्यांमधील संघर्ष वाढतच गेला. कोरोना काळात तर हा संघर्ष टोकाला गेला. शिवसेनेतून बाहेर पडून एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर शिवसेनेचे नेते चंद्रकांत रघुवंशी यांनीही उद्धव ठाकरेंची साथ सोडत शक्ती प्रदर्शन करत मोठ्या संख्येने एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले.

एकनाथ शिंदे यांनी मध्यस्थी करूनही पदाधिकाऱ्यांची काँग्रेसला मदत

नंदुरबार लोकसभेसाठी भाजपाने दोन वेळेसच्या खा. डॉ. हिना गावित यांना पुन्हा उमेदवारी दिली. मात्र शिंदे गटातील नेते माजी आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी या उमेदवारीला विरोध करून प्रचारापासून ते लांबच राहिले. डॉ. विजयकुमार गावित हे शिंदे गटातील कार्यकर्त्यांना डावलत असल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष ॲड. राम रघुवंशी हे भाजपाच्या एका सर्वपक्षीय बैठकीत उपस्थित होते. मात्र त्यानंतर ते कुठेही दिसले नाही. दरम्यान भाजपच्या उमेदवार डॉ. हिना गावित यांनी प्रचाराचा शुभारंभ करण्यासाठी चंद्रकांत रघुवंशी यांच्या कार्यालयात जाऊन त्यांना निमंत्रण दिले. मात्र कार्यकर्ते ऐकण्याच्या स्थितीत नाहीत, वरिष्ठ पातळीवर चर्चा करूनच यावर तोडगा काढला जाईल, असे सांगत रघुवंशी यांनी एकत्र येण्याच्या चर्चांवर पूर्णविराम दिला. त्यानंतर दहा मे रोजी नंदुरबार येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा होणार होती. या सभेसाठी त्यांना आमंत्रण देण्यात आले. व्यासपीठावरही चंद्रकांत रघुवंशी उपस्थित राहिल्याने त्यांचे मत परिवर्तन होईल, असे वाटत असताना तसे काही घडले नाही .

## आमदार पी. एन. पाटील यांचे निधन

तालुक्यातील सडोली खालसा हे आहे. पूर्वीचा सांगरूळ विधानसभा मतदारसंघ आणि आताचा करवीर विधानसभा मतदारसंघात गावपातळीपर्यंत बांधलेली त्यांची कार्यकर्त्यांची फळी आजही तितकीच मजबूत आहे.दरम्यान, पी.एन. पाटील हे पहिल्यांदा २००४ साली आमदार झाले होते. त्यानंतर २००९ आणि २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यांच्या या पराभवाला पक्षातीलच काही लोक जबाबदार असल्याचे बोलले जात होते. परंतु, पी. एन. पाटील हे कोणी गद्दारी केली म्हणून त्याच्यावर कधीच द्वेष दाखवत नव्हते. यानंतर पाटील यांना काँग्रेसने २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा उमेदवारी दिली असता ते या निवडणुकीत मोठ्या मताधिक्क्याने विजयी झाले.

# निराधारांचे अनुदान थेट बँक खात्यात जमा होणार

## डीबीटी मार्फत मिळणार अनुदान

**नगर : प्रतिनिधी**

**निराधार व्यक्तींसाठी दिलासा देणारी बातमी समोरयेत आहे. निराधार व्यक्तींना शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून महिना काठी ठराविक मानधन दिले जाते. हे मानधन लाभार्थ्यांना तहसीलस्तरावरून बँकेत पाठवून संबंधितांच्या खात्यात वर्ग केले जाते. मात्र, आता थेट डीबीटीमार्फत निराधार व्यक्तींच्या खात्यात अनुदान दिले जाणार आहे.**



संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेच्या लाभासाठी यापूर्वी तहसीलकडून संबंधित बँकेत सर्व लाभार्थ्यांची यादी पाठवून त्यानुसार निधी दिला जात होता. तो निधी बँकेकडून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग केला जात होता. या प्रक्रियेस विलंब होत होता. त्यामुळे वयोवृद्ध लाभार्थ्यांना अनुदानासाठी बँकेत हेलपाटे मारावे लागत होते. मात्र, आता निराधारांना अनुदान थेट डीबीटीमार्फत मिळणार आहे. या योजनांचा लाभ घेत असलेल्या पात्र निराधारांकडून आधार आणि मोबाईल क्रमांक संकलित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.









# मळगंगा ट्रस्ट निवडणूक अर्जावर सभासदांच्या उड्या !

## ■ २१ जागांसाठी १३६ अर्जांची विक्री ■ ५३ अर्ज दाखल ■ अपक्षांवरच निवडणूकीचे समीकरण



निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या स्थापनेपासून प्रथम होणाऱ्या विश्वस्त मंडळाच्या निवडणूकीसाठी इच्छुकांची संख्या मोठी असून उमेदवारी अर्ज खरेदीसाठी इच्छुकांच्या उडया पडल्या आहेत.२१ जागांसाठी १३६ अर्जांची विक्री झाली असून ५३ अर्ज दाखल झाले आहेत.**

गुरूवार दि. २३ रोजी दुपारी एक वाजेपर्यंत अर्ज विक्रीची मुदत होती. त्यासाठी सव्वाशेहून अधिक अर्जांची विक्री झाली आहे. इच्छुकांच्या मोठया संख्येमुळे ही निवडणूक चांगलीच गाजण्याचे संकेत मिळू लागलेू असून दोन पॅनलमध्ये निवडणूक अटळ असली तरी अपक्ष म्हणून किती उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरतात यावरच या निवडणूकीचे समीकरण अवलंबून असेल.

चाळीस,बेचाळीस वर्षांपूर्वी निघोजमधील ज्येष्ठ कारभा-यांनी मळगंगा देवीचा उत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यासाठी तसेच शासनदरबारी विविध विकास कामांचा पाठपुरावा तसेच आवष्यक प्रस्ताव देण्यासाठी ट्रस्टची स्थापना केली. ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष स्व. बाबासाहेब कवाद, मा. सरपंच स्व. किसनराव वराळ, मा. सरपंच रामचंद्र वराळ, ज्येष्ठ कारभारी बाळाजी लंके, मा. पोलीस पाटील गबाजी लंके, मा. पं. स. सदस्य स्व. मच्छिंद्र वराळ, मा. उपसभापती नानाभाउ वरखडे, मा. सरपंच तथा बाजार समितीचे मा. उपसभापती संदीप वराळ यांच्यासह अनेक ज्येष्ठ कारभारी यांनी या ट्रस्टमध्ये आजवर मोठे योगदान दिले आहे.

पुढील काळात ट्रस्टची धुरा यशस्वीपणे सांभाळण्यासाठी मा. सरपंच रामचंद्र वराळ, मा. सरपंच एस के वराळ, मा. विश्वस्त अनंतराव वरखडे, कार्याध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद, उपाध्यक्ष शांताराम लंके, कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके, मा. विश्वस्त नाना पाटील लंके यांच्यासह आजी, माजी विश्वस्त, आजी माजी पदाधिकारी यांचेही मोठे योगदान लाभलेले आहे.

### कार्याध्यक्ष, उपाध्यक्षांची थांबण्याची भूमिका

विद्यमान कार्याध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद हे या निवडणूकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. पुन्हा पदाधिकारी होण्यात त्यांना स्वारस्य नसून त्यामुळेच निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. कन्हैय्या उद्योग समुहाचे सर्वेसर्वा शांताराम लंके यांनी ट्रस्टचे अनेक वर्षे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. यंदा मात्र आरोग्याचे कारण तसेच तरूणांना संधी मिळावी म्हणून त्यांनी थांबण्याचा निर्णय घेतला आहे.



### १ हजार १८१ मतदार

गेल्या तीन वर्षात सभासदांची संख्या तीनशेच्या पुढे जाऊन ती साडेबाराशेपर्यंत जाऊन पोहचली. या निवडणूकीत १ हजार १८१ सभासद मतदानासाठी पात्र आहेत.

### कोषाध्यक्ष लंके संभ्रमावस्थेत

विद्यमान कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके हे यंदा ट्रस्टचे अध्यक्ष होण्यासाठी उत्सुक आहेत. मात्र काही विश्वस्तांनी सभासदांची संख्या मोठया संख्येने वाढविल्याने या निवडणूकीत आपणास यश येईल का ? याबाबत त्यांना साशंकता आहे. त्यामुळे निवडणूक लढवावी किंवा नको याबाबत ते व्दिधा मनस्थितीत असल्याची माहीती आहे.

### कवाद, वराळांमध्ये लढत

बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष तथा विद्यामान विश्वस्त वसंत कवाद, संदीप पाटील जनसेवा फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन वराळ यांच्या ऐंशीपेक्षा अधिक समर्थकांनी उमेदवारी अर्ज खरेदी केले आहेत. त्यापैकी अर्ज कोण दाखल करणार हे येत्या २४ तारखेला दुपारी एक वाजता स्पष्ट होईल.

### तर संमीश्र निकाल

पॅनलमधील उमेदवारांना एकच समान चिन्ह देण्यात येणार आहे. प्रत्येक मतदाराला २१ मते देण्याचा अधिकार असेल. पॅनल टू पॅनल मतदानाची शक्यता वर्तविण्यात येत असली तरी काहींना टाळण्यासाठी राजकीय खेळी पॅनलमधील महाभागांनी केल्यास संमीश्र निकालाची शक्यताही नाकारता येणार नाही.

### बिनविरोधसाठीही हालचाली

निवडणूकीची प्रक्रिया सुरू झाली असली तरी निवडणूक टाळण्यासाठी निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांची भूमिका लक्षात घेऊन ज्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले त्यांची एकत्रीत बैठक उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या एक दिवस आगोदर होण्याची शक्यता आहे. या बैठकीच्या माध्यमातून बिनविरोध विश्वस्त मंडळासाठी प्रयत्न सुरू आहेत.

### निवडणूकीच्या रिंगणात ५० उमेदवारांची शक्यता

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अतिशय सोपा आहे. सभासद क्रमांक, आधार कार्ड झेरॉक्स, उमेदवार, अनुमोदक व सुचक यांच्या सहया इतकाच मजकुर असल्याचे छानणीमध्ये अर्ज बाद होण्याची शक्यता नाही. सव्वाशे अर्ज नेलेल्या इच्छुकांपैकी दहा ते बारा इच्छुकांनी एकापेक्षा अधिक अर्ज घेतले आहेत. उमेदवारांची सरासरी संख्या ११५ गृहीत धरली तरी बहुतांश सभासद हे एकमेकांचे समर्थक कार्यकर्ते असल्याने २१ जागांसाठी ५० उमेदवार स्पर्धेत राहतील असा कयास आहे. दोन्ही पॅनलचे २१ अधिक २१ व इतर अपक्ष सात ते आठ असे ५० उमेदवारांमध्ये ही लढत होण्याची चिन्हे आहेत. अपक्षांमध्ये तुल्यबळ उमेदवार असेल तरच तो बऱ्यापैकी मतदान घेऊ शकेल.

### तुल्यबळ अपक्षांची भूमिका महत्वाची

अपक्षांमध्ये तुल्यबळ उमेदवारांची संख्या पाच ते सहा असल्यास पॅनलच्या काही उमेदवारांच्या मतांमध्ये घट होउन त्याचा फायदा दोन्ही पॅनलच्या उमेदवारांना मिळू शकतो.

### ज्येष्ठांची माघार

ही निवडणूक प्रतिष्ठेची झाल्याने बहुतांश ज्येष्ठांनी निवडणूकीच्या रिंगणातून माघार घेणे पसंत केले आहे. निवडणूक बिनविरोध होणार असेल तर आम्ही विश्वस्त मंडळात सहभागी होण्यास तयार आहोत अशी त्यांची भूमिका आहे.

### अनामत रक्कम देणगी खात्यात

सर्वाधिक उमेदवारांनी अर्ज दाखल केले तर पाचशे रूपये अनामत रक्कम असून ही रक्कम देणगी म्हणून मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला देण्याचा उमेदवारांचा निर्णय होणार आहे. त्यामुळे ट्रस्टला निवडणूकीचा खर्च येणार नाही व देणगीदारांमध्येही चांगला संदेश जाईल.

### ज्ञानदेव लंके यांच्यासाठी आग्रह

मुंबई येथील व्यवसायीक ज्ञानदेव लंके हे गेली अनेक वर्षे ट्रस्टमध्ये पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. एकूण सभासदांपैकी ६०० हून अधिक सभासद त्यांच्या नेतृत्वाचा पुरस्कार करणारे आहेत. मळगंगा देवी मंदिराचे बांधकाम तसेच परीसरातील विकास कामे यासाठी लंके यांचे मोठया प्रमाणात योगदान आहे. लोकसहभागातील देणगीचा विषय असला की लंके हे मुंबईहून हमखास पाच-दहा लाखांची देणगी घेऊन येणार ही त्यांची आजवरची खासीयत. ट्रस्ट अध्यक्षपदावर एक ज्येष्ठ मार्गदर्शक म्हणून त्यांचा अधिकार आहे. त्यांनी निवडणूक लढवावी यासाठी ज्येष्ठ व युवक मंडळी प्रयत्नशील आहेत. कोणत्याही पॅनलकडून ते लढले तर त्यांना यश येईल अशा प्रतिक्रीया सभासदांच्या आहेत.

# नेपाळच्या शिष्टमंडळाची हिवरेबाजारला भेट

## हिवरेबाजारची स्वावलंबी खेडयाची संकल्पना अतुलनीय, सुषमा काफले यांचे गौरोद्गार

हिवरे बाजार : प्रतिनिधी

**नेपाळच्या पाणीपुरवठा व जलसंधारण विभागासह विविध विभागांच्या २० अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने हिवरेबाजारला भेट देऊन विविध पथदर्शक प्रकल्पांची पाहणी करून माहीती घेतली. हिवरेबाजारची स्वावलंबी खेडे विकसित करण्याची संकल्पना अतुलनीय असल्याचे गौरोद्गार या शिष्टमंडळाच्या प्रमुख सुषमा काफले यांनी काढले.**

नेपाळ सरकार तसेच भारताचे जलशक्ती, जलसंशोधन मंत्रालय, नदी विकास विभाग, केंद्रीय जल आयोग, राष्ट्रीय जल आकादमी यांच्या वतीने हिवरेबाजार येथे प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पद्मश्री पोपटराव पवार यांनी शिष्टमंडळातील सदस्यांना हिवरे बाजार गावातील संपूर्ण विकास कामांची माहीती दिली.

यावेळी बोलताना शिष्टमंडळाच्या प्रमुख काफले म्हणाल्या,हिवरे बाजार हे स्वावलंबी खेडे विकसित करण्याची संकल्पना अतुलनीय आहेत. हे खेडे पाहून विविध विकास कामांची पाहणी करण्याची संधी आम्हाला मिळाली त्याबद्दल आम्ही पद्मश्री पोपटराव पवार यांच्याप्रती आभार व्यक्त करतो. हिवरे बाजार गावच्या शास्वत विकासासाठी त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण परिश्रमाने नेपाळचे शिष्टमंडळ अतिशय प्रेरीत झाल्याचे काफले म्हणाल्या.

राष्ट्रीय जल अकादमीचे संचालक मिलिंद पानपाटील यांनी या प्रक्षेत्र भेटीचे आयोजन केले होते. नेपाळ देशातील विविध खात्यांचे अभियंते, कक्ष प्रमुख, अर्थ विभागातील प्रमुख अशा २० सदस्यांचा या शिष्टमंडळात समावेश होता.



### आवष्यक बदलांसाठी पुढाकार हवा

हिवरे बाजार हे गाव सर्व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या दृष्टीने स्वयंपूर्ण असून एक स्वयं शास्वत गावांपैकी एक गाव पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली उभे करण्यात आले आहे. आधुनिक भारताच्या विकासासाठी प्रत्येक गावाने अशा प्रकारचे प्रकल्प राबविले पाहिजेत. त्यासाठी आवष्यक बदलांसाठी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे मत शिष्टमंडळातील सदस्यांनी व्यक्त केले.

# श्री धर्मनाथ विद्यालयात मुलींची बाजी

## विद्यालयाचा निकाल ७५ टक्के

जवळे : प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत तालुक्यातील जवळे येथील श्री धर्मनाथ माध्यमिक व उच्च विद्यालयातीच्या विद्यार्थीनींनी बाजी मारली. विद्यालयाच्या कला शाखेचा निकाल ७५ टक्के इतका लागल्याची माहीती प्राचार्य आर. डी.कदम यांनी दिली.**

कला शाखेची विद्यार्थीनी वंदना संतोष गाडीलकर हिने ६४.८३ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकाविला. सायली भास्कर शिंदे हिने ६३.६७ टक्के गुण प्राप्त करून व्दितीय तर मयुरी संतोष लामखडे हिने ६०.५० टक्के गुण मिळवून विद्यालयात तिसरा क्रमांक मिळविला.



उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य आर. डी. कदम, पर्यवेक्षक जी. बी.शिंदे, वाय. ए.पवार, पी.डी.शिंदे, श्रीमती व्ही.व्ही. चौधरी, पी.डी. शिंदे आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. उत्तीर्ण विद्यार्थी व विद्यार्थीनींचे शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सदस्य तसेच सरपंच, उपसरपंच, सदस्य यांच्यासह ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विद्याधामच्या मुली १२ वीच्या परीक्षेत अव्वल

## देवदैठणच्या विद्यालयाचा निकाल १०० टक्के

सुपा : प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या १२ वीच्या उच्च माध्यमिक परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला असून देवदैठण येथील विद्याधाम कला कनिष्ठ महाविलयात मुली अव्वल ठरल्या आहेत. या विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागल्याची माहीती प्राचार्य बाळासाहेब दहीफळे यांनी दिली.**

एकीकडे या परीक्षेत विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागलेला असताना दुसरीकडे विद्यालयात पहिल्या तीनही स्थानावर मुली अव्वल ठरल्या. वैष्णवी दीपक घेगडे हिने ७४.१७ टक्के गुण प्राप्त करून पाहिला क्रमांक पटकाविला. धनश्री संजय शेळके हिने ७०.३३ टक्के गुण मिळवून दुसरा तर मानसी जालिंदर बनकर हिने ७०.१७ टक्के गुण मिळवून विद्यालयात तिसरा क्रमांक मिळविला.




### या विद्यार्थ्यांना मिळाले ग्रेस मार्कस्

श्रृती बनकर, साक्षी कोरके, आर्यन वाघमारे, रूपेश वाळुंज या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेतील सहभागाबददल या परीक्षेत प्रत्येकी १५ गुण ग्रेस मिळाले आहेत. अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रात नैपुण्य दाखवित या विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत अधिकच्या १५ गुणांची कमाई केली असून ती इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

परीक्षेतील सर्व यशस्वी विद्यार्थी, विद्यार्थीनींना कांता मांडगे, सोनाली शेळके, सतीश कौठाळे, लक्ष्मण आयरे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी, विद्यार्थीनींचे, मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम, शळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चदुलाल चोरडिया, प्राचार्य बाळासाहेब दहिफळे, पर्यवेक्षक विशाल डोके यांच्यासह ग्रामस्थ, पालकांनी अभिनंदन केले.

# खून करून पसार होण्याच्या तयारीतील आरोपी गजाआड

## गुन्हा दाखल ; दोन दिवसांची पोलिस कोठडी



नगर : प्रतिनिधी

**येथील काटवन खंडोबा परिसरात परप्रांतीय व्यक्ती खून करून पसार होण्याच्या तयारीत असतानाच कोतवाली पोलिसांनी त्याला जेरबंद केले. प्रमोद दीपचंद विश्वकर्मा (रा. बांकी, शेजवाडा, जि. छिंदवाडा, राज्य मध्यप्रदेश) असे जेरबंद आरोपीचे नाव आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.**

काटवन खंडोबा परिसरात प्रमोद विश्वकर्मा याने सोमवारी (ता. २१) रात्री उशिरा अशोककुमार अमरजीत (रा. बसोली बुद्रुक, जि. गोरखपूर, राज्य उत्तरप्रदेश) याचा दगडाने ठेचून खून केला. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपअधीक्षक अमोल भारती व कोतवाली पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रताप दराडे यांनी घटनास्थळी भेट दिली. आरोपी प्रमोद हा पसार होण्याच्या तयारीत असतानाच कोतवाली पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्या विरोधात कोतवाली पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला कोतवाली पोलिसांनी आज न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला शुक्रवार (ता. २४)पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# देवदैठणच्या विद्यार्थीनींची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

## नागपुर येथे पार पडणाऱ्या राज्य मैदानी स्पर्धेत सहभाग

सुपा : प्रतिनिधी

**नागपुर येथे येत्या १ ते ३ जुन या कालावधीत पार पडणाऱ्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी देवदैठण येथील दोन विद्यार्थीनींची निवड झाली आहे. देवदैठणच्या श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेल्या या विद्यार्थीनी असून राज्यस्तरीय स्पर्धे साठी दोघींचीही खुल्या गटातील मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अलिकडेच राहुरी येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धेत कोमल मच्छिंद्र बनकर हिने लांब उडी व तिहेरी उडी क्रीडा प्रकारात अव्वल स्थान पटकावत प्रथम क्रमांक मिळविला. तर प्राजक्ता गौतम पवार हिने लांब उडी व तिहेरी उडी क्रीडा प्रकारात व्दितीय क्रमांक पटकाविला. त्यामुळे दोघींचीही राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली असल्याचे क्रीडा शिक्षक संदीप घावटे यांनी सांगितले.



नागपुर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज क्रीडा संकुल येथे १ ते ३ जुन दरम्यान पार पडणा-या क्रीडा स्पर्धेमध्ये या विद्यार्थीनी सहभागी होणार आहे. क्रीडा शिक्षक संदीप घावटे यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

दोन्हीही गुणवंत खेळाडू विद्यार्थीनी तसेच मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंदुलाल चोरडीया, प्राचार्य बाळासाहेब दहिफळे, पर्यवेक्षक विशाल डोके यांच्यासह ग्रामस्थांनी अभिनंद करून नागपुर येथे पार पडणाऱ्या क्रीडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### क्रीडा स्पर्धेत विद्याधामचा डंका

विविध क्रीडा स्पर्धेत देवदैठण येथील विद्याथी, विद्यार्थीनी आपली चमक दाखवत असून आतापर्यंत राज्य व राष्ट्रीय पातळीवर या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले वर्चस्व सिध्द केले आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com